16 OCT 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्टार्टअप' शिबिरातून नवउद्योजक घडावेत

## कुलगुरू डॉ. शिर्के; स्टार्टअप यात्रा जिल्हास्तरीय शिबिर



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित 'स्टार्टअप यात्रा'अंतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिरात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, संजय माळी, श्रीकृष्ण महाजन, डॉ. एम. एस. देशमुख आदी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तरुणांनी नाविन्यपूर्ण संकल्पनांचा उपयोग करून उद्योगनिर्मिती करताना अपयश आल्यास खचून न जाता जिद्दीने वाटचाल करून यशाच्या दिशेने पुढे जावे. प्रशासनातर्फे घेण्यात येणाऱ्या 'स्टार्ट अप' शिबिरातून जिल्ह्यात अधिकाधिक नवउद्योजक घडावेत, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र 'स्टार्टअप यात्रा'च्या दुसऱ्या टप्प्यामधील जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करुन स्टार्टअप सुरू करण्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजात आढळणाऱ्या बाबींकडे टीकात्मक नजरेतून न बघता त्यातून चांगला बदल घडवण्यासाठी प्रयत्न करावेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, नवकल्पनांवर आधारित स्टार्टअपमध्ये तरुणांचा सहभाग आवश्यक आहे. रस्त्यावरील पालापाचोळा, खराब प्लास्टिक अशा टाकाऊ वस्तूंचा वापर करून पर्यावरणपूरक नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी पुढे येत आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे. नवउद्योजक कृष्णराज महाडिक यांनी विद्यार्थी, कार रेसर ते उद्योजक असा प्रवास उलगडला. प्रास्ताविकात सहायक संचालक संजय माळी यांनी स्टार्टअप यात्रेचा उद्देश विशद केला. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या नवसंकल्पनांना जिल्हा व राज्यपातळीवर आकर्षक बक्षीस देण्यात येणार असल्याचे सांगितले. डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, श्रीकृष्ण महाजन, प्रा. डॉ. एस. एन. सपली आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात डॉ. अब्दुल कलाम यांची जयंती

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी राष्ट्रपती व ज्येष्ठ वैज्ञानिक भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव आटपाडीत रंगणार

सकाळ वृत्तसेवा

आटपाडी, ता. १५ : येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात सांगली, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या विद्यापीठाचा बेचाळिसावा मध्यवर्ती युवा महोत्सव ता. १६ ते १८ असा तीन दिवस होणार आहे. त्याची जय्यत तयारी आयोजक शिवाजी विद्यापीठ आणि श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाने केल्याची माहिती युवा महोत्सव स्थानिक संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय लोंढे यांनी दिली.

बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात या तीन जिल्ह्यांतील १३२ महाविद्यालयांच्या एकत्रित युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. उद्या (ता. १६) सकाळी दहाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभाग संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, माजी प्राचार्य डॉ. सुभाष कारंडे आदींची उपस्थिती आहे.

तीन दिवस चालणाऱ्या महोत्सवात तीन हजार विद्यार्थी विविध कला-गुणांचे सादरीकरण महाविद्यालयाच्या परिसरातील विविध सभागृहांमध्ये करणार आहेत. तेथील बैठक आणि अन्य व्यवस्था तयारी पूर्ण झाली आहे. पहिल्या दिवशी लोककला, मूकनाट्य, नकला, एकपात्री अभिनय, लघुनाटिका, शास्त्रीय गायन, व्यंग्यचित्र, मेहंदी, रांगोळी आदी स्पर्धा होणार आहेत. सोमवारी (ता. १७) पाश्चिमात्य समूहगीत, वाद्यवादन, लोकसंगीत, लोकनृत्य, स्थळचित्रण, स्थळ छायाचित्र, मातीकाम स्पर्धा होणार आहेत; तर मंगळवारी (ता. १८) माजी विद्यार्थी संमेलन आणि महोत्सवाचा समारोप होणार आहे.

लोकमत

# दूरशिक्षणच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बीकॉम, एम.ए (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एमएस्सी (गणित), आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ दिली आहे. सोमवार (दि. ३१)पर्यंत प्रवेश घेता येणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. मोरे म्हणाले, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८७ अभ्यास केंद्रात प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2022

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक अधिसूचना प्रसिध्द

कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा अधिनियम, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांवर सदस्य निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिध्द करण्यात आली.

यानुसार अधिसभा ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्य याप्रमाणे निवड होणार आहे.

पुण्यनगरी

# उपकुलसचिव संजय कुबल यांना पीएच.डी.

कोल्हापूर : विद्यापीठाचे उपकुलसचिव संजय कुबल यांना मानव्यशास्त्र विद्याशाखेंतर्गत पीएच.डी. पदवी जाहीर झाली. त्यांनी राज्यशास्त्र विषयामध्ये 'महाराष्ट्रातील राजकीय विचारांतील शेती प्रश्नाचे चर्चाविश्व' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. डॉ. प्रकाश पवार यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले.

